## मार्गदर्शकाचे प्रमाणपत्र

प्र. सौ. अनुराधा प्रमोद कुलकर्णी, सांगली ह्यांनी माझ्या मार्गदर्शनाखाली संशोधन करून " गोविन्दाग्रज आणि भा. रा. तांबे यांच्या प्रेमकवितांचा तौलनिक अभ्यास " हा लघु-शोधप्रबंध एम्. फिल्. पदवीसाठी तयार केला आहे.

[signature]

[ वि. ना. कुलकर्णी ]
मान्यताप्राप्त संशोधन मार्गदर्शक,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

१३, श्रीसद्गुरु हौसिंग सोसायटी,
विश्रामबाग, सांगली.
दिनांक : २२-१२-१९८९

# प्रस्तावना

मराठी काव्य हा शालेय जीवनापासून माझ्या आवडीचा विषय आहे. सुदैवाने महाविद्यालयामध्ये मला आधिक्याने काव्यग्रंथ शिकवावे लागले. माझ्या या अध्यापनात गो.म.कुलकर्णी संपादित " हृदयशारदा " हे गोविन्दाग्रजांच्या कवितांचे आणि रा.श्री.जोग संपादित " प्रणयप्रभा " हे तांब्यांच्या कवितांचे पुस्तक समाविष्ट झालेले होते. या दोघांच्या कविता शिकवीत असता त्यांच्यामध्ये बरेचसे साम्य, पुष्कळसे वैषम्य मला आढळले होते. तथापि या दोन कवींचा तौलनिक अभ्यास करण्याचा तसा प्रसंग माझ्या महाविद्यालया-तील अध्यापनात तरी उपस्थित झालेला नव्हता. या कवींच्या तुलनात्मक अभ्यासाचा विचार मनात येऊनही तो कुठे प्रकट करता आलेला नव्हता किंवा त्यासंबंधी अधिक विचार करण्याजोगी संधीही प्राप्त झालेली नव्हती. मला शिवाजी विद्यापीठाच्या एम्. फिल्. साठी विलिंग्डन महाविद्यालयात प्रवेश मिळाला, तेव्हा एम्. फिल्च्या लघु-शोध-प्रबंधासाठी हा विषय निवडला तर बरे होईल असे मला वाटले. माझ्या मार्गदर्शकांना हा विषय कितपत मान्य होतो अशी धागधूग माझ्या मनात होती पण सरांशी या संदर्भात चर्चा केल्यानंतर आमच्या दोघांच्या विचारे या दोन कवींच्या प्रेमकवितापुरताच हा तौलनिक अभ्यास मर्यादित करून घ्यावा असे ठरले. अशाप्रकारे गोविन्दाग्रज आणि तांबे यांच्या कवितांचा तौलनिक अभ्यास करण्याचा जो माझा विचार होता त्याला मूर्त स्वरूप आले.

गोविन्दाग्रज आणि तांबे यांच्या प्रेमकवितांच्या तौलनिक अभ्यासाला प्रत्यक्षात प्रारंभ केल्यानंतर हे काम पूर्वी वाटले होते तितके सोपे नाही हे माझ्या लक्षात येऊ लागले. संशोधनात कदाचित्

असेच होत असावे असे मला वाटते. या दोघांच्या कवितांबद्दलच्या माझ्या पूर्वीच्या कल्पना अगदीच स्थूल होत्या असे मला माझ्या या संशोधनात सतत जाणवत राहिलेले आहे हे मोकळेपणाने मान्य केले पाहिजे. माझ्या मार्गदर्शकांच्या बरोबर वारंवार केलेल्या चर्चेनंतर माझ्या तौलनिक अभ्यासाला निश्चित दिशा येत गेली आणि माझ्या हातून हे काम पूर्ण झाले.

हा लघु-शोधप्रबंध सादर करताना मला अनेकांचे सहकार्य आणि प्रोत्साहन मिळाले आहे. त्या सर्वांबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे हे मी माझे कर्तव्य समजते.

माझे मार्गदर्शक आदरणीय गुरुवर्य डॉ. वि.ना.कुलकर्णी यांनी मला अभ्यासाची दिशा दाखविली आणि त्यानुसार माझ्याकडून वाचन व लेखन करून घेतले. माझ्या हातून हे काम त्यामुळेच पुरे होऊ शकले. सरांच्या या मार्गदर्शनाबद्दल मी त्यांची सदैव ऋणी राहीन. सरांच्या प्रमाणेच त्यांच्या घरातील सर्वांनी मला नेहमी प्रोत्साहन दिलेले आहे.

लघु-शोध-प्रबंध लिहीत असताना जयसिंगपूर कन्यामहाविद्यालयाचे प्राचार्य बी.ए.पाटील, विलिंग्डन महाविद्यालयाचे माजी प्राचार्य क.म.आगाशे आणि याच महाविद्यालयाचे विद्यमान प्राचार्य डॉ.बी.ए. पाटील या तिघांही प्राचार्यांनी माझ्या अभ्यासाची नेहमी आपलेपणाने चौकशी करून माझा उत्साह वाढविला. या सर्व प्राचार्यांची मी मन:पूर्वक आभारी आहे.

माझ्या या लघु-शोधप्रबंधास अनेक ग्रंथालयांची बहुमोल मदत झाली आहे. विलिंग्डन महाविद्यालयाचे ग्रंथपाल श्री.य.श्री. रास्ते

व सेवकवर्ग यांनी अत्यंत तत्परतेने संदर्भग्रंथ देऊन मला बहुमोल सहकार्य केले. कस्तुरबाई वालचंद महाविद्यालय, सांगलीचे ग्रंथपाल श्री. मासुले यांनीही मला संदर्भ पुस्तकांच्या बाबतीत खूपच सहकार्य केले. सांगली नगर वाचनालयातील कु. सुनंदा कुलकर्णी आणि श्री. फाटक, जयसिंगपूर कन्या महाविद्यालयाच्या ग्रंथपाल सौ. पाटील, झेले हायस्कूल जयसिंगपूरच्या ग्रंथपाल कु. मरजे यांनी मला तत्परतेने पुस्तके पुरविली. या सर्व ग्रंथालयांचे, ग्रंथपालांचे व सेवकवर्गाचे ऋण मानणे मी माझे कर्तव्यच मानते.

माझ्या लघु-शोधप्रबंधाचे लेखन चालू असता प्रा. कु. मीना कुलकर्णी, प्रा. मुकुंद पुजारी व सौ. नवाथे यांनी मला काही चांगल्यापैकी सूचना करून उपकृत केलेले आहे.

संसारी स्त्री म्हटले की, तिला एकाच वेळी अनेक व्यवधाने सांभाळावी लागतात. त्यामुळे घरच्या सर्व लहान थोरांचे सहकार्य असल्याशिवाय मला हे शोधकार्य पुरे करणे अशक्य होते.

आईच्या आशीर्वादाचे का कुणी आभार मानतात ? तिच्या प्रोत्साहनाची थाप माझ्या पाठीवर होती, म्हणून तर हे प्रबंधकार्य शक्य झाले आहे.

माझ्या लघु-शोधप्रबंधाच्या टंकलेखनाचे काम " काटकर्स कॉम्प्युटर सेंटर " यांनी अगदी थोड्या अवधीत करून देऊन मोलाचे सहकार्य केले आहे. त्यांचेही ऋण मानणे माझे कर्तव्य आहे.

तसेच या प्रबंधाच्या बांधणीचे काम श्री. गोखले यांनी अनेक कामांतून फुरसत काढून करून दिले आहे. त्यांचीही मी उपकृत आहे.

दिनांक 22-12-1989

सौ. अनुराधा कुलकर्णी.

[ सौ. अनुराधा कुलकर्णी ]

- अनुक्रमणिका -


प्रकरण पहिले

मराठी प्रेमकविता : काही वळणे - [ पृ.१ ते २८ ]

---

| | |
|---|---|
| संतांची मधुराभक्ती | ३ |
| पंडित कवींची प्रेमाभिव्यक्ती | ६ |
| शाहिरांचे शारीरप्रेम | ८ |
| केशवसुत संप्रदाय | ११ |
| रविकिरणमंडळाचा प्रेमाविष्कार | १६ |
| नवकवींची प्रेमवृत्ती | १९ |
| कवयित्रींचा प्रेमाविष्कार | २२ |
| दलित प्रेमकविता | २४ |

---

प्रकरण दुसरे

गोविन्दाग्रजांची प्रेमकविता - [ पृ.२९ ते ९० ]

---

| | |
|---|---|
| गोविन्दाग्रजांच्या जीवनचित्रासंबंधी थोडेसे | २९ |
| काव्यसंख्या आणि वर्गीकरण | ३५ |
| प्रेमास सावधगिरीचा सल्ला | ३६ |
| निरभिलाष प्रेमवृत्ती | ३८ |
| प्रेमाचा महिमा | ४० |
| साभिलाष प्रेम | ४३ |
| निराश प्रेमाचे चित्रण | ४६ |

आशा-निराशेचा खेळ ५१
"वाग्वैजयंती"तील मधुराभक्ती ५९
मुग्ध शृंगाराचा आविष्कार ६१
शारीर प्रेमाची अभिव्यक्ती ६३
वस्तुनिष्ठ प्रीतीची अभिव्यक्ती ६५
गोविन्दाग्रजांचे प्रेमप्रकरण ७२
निष्कर्ष ८८

---

प्रकरण तिसरे

प्रेमकवी भा.रा.तांबे – [ पृ.९१ ते १३२ ]

---

तांबे यांचे जीवनचरित्र ९१
तांब्यांचा काव्य लेखनकाल ९५
प्रणयाचे प्राधान्य ९७
प्रणयाचे विविध रंगढंग ९८
तांबे यांचे आत्मनिष्ठ प्रेमकाव्य ९९
तांब्यांचे वस्तुनिष्ठ प्रेमभावदर्शन १०३
अ] विधवाविषयक प्रेमगीते १०५
ब] स्त्रियांचे प्रेमचित्रण १०६
क] प्रणयी पुरूषांचे चित्रण १०९
ड] तांबे यांच्या संवादात्मक कविता १११
तांबे यांची मधुराभक्ती ११४
तांबे यांच्या काव्यातील शृंगाररस ११६

| | |
|---|---|
| आन्तरिक प्रीतीची ओढ | ११८ |
| तांब्यांच्या कवितेतील शारीरिकता | ११९ |
| तांब्यांच्या प्रेमगीतातील मिस्किल आणि मुग्ध शृंगार | १२१ |
| तांब्यांची सफल आणि विफल प्रीतीची चित्रे | १२५ |
| प्रेमभावनेचे साधारणीकरण. | १२७ |
| निष्कर्ष | १३० |

---

प्रकरण चौथे

गोविन्दाग्रज आणि तांबे यांच्या प्रेमकवितांची तुलना [ पृ.१३३ ते ]

---

| | |
|---|---|
| जीवनचरित्र | १३३ |
| काव्यलेखन | १३७ |
| गोविन्दाग्रज आणि तांबे यांच्या काव्यप्रेरणा | १३९ |
| गोविन्दाग्रज आणि तांबे यांची प्रेमाभिव्यक्ती | १४२ |
| अ] प्रेममहिमा | १४२ |
| ब] मुग्ध प्रणयाची चित्रे | १४४ |
| क] शारीरिक शृंगार | १४५ |
| ड] मधुराभक्ती | १४८ |
| ई] प्रीतीचा ठसा उमटविणारा क्षण | १४९ |
| अ] बाह्य आणि आंतरिक सौंदर्य | १५१ |
| ब] निरागसता आणि कडवटपणा | १५४ |

क] वेदना आणि तृप्ती १५७
ड] वैषम्याच्या अन्य बाजू १६१
काव्य आणि कलाविषयक विचार १६६
प्रेमाचे शाहीर १६८
निष्कर्ष १७०

---

प्रकरण पाचवे
उपसंहार [ पृ.१७३ ते १८० ]

---

संदर्भसूची

---